# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१६/३२/६१
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : 06/01/2017

प्रति,
*मुख्याधिकारी,*
---------------- *नगरपंचायत,*
*जि.*------------

विषय: **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान** राबविणेबाबत.
संदर्भ: १.शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/ प्र.क्र.२११/नवि-२०, दि.३१.०८.२००९.
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि-२०, दि.१२.०८.२०१६

***महोदय,***

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि. ३१.०८.२००९ अन्वये राज्यातील ड-वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा यांच्या अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान** राबविण्यास च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये नव्याने निर्माण झालेल्या व होणा-या ड वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायतींना महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान योजनेत सहभागी करुन घेण्यांत आले आहे. या योजनेअंतर्गत शासन हिश्याचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | ड वर्ग महानगरपालिका | - ३५% |
| ब) | अ वर्ग नगरपरिषदा | - ५०% |
| क) | ब वर्ग नगरपरिषदा | - ७०% |
| ड) | क वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायती | - ८०% |

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपल्या नगर पंचायतीस अनुज्ञेय असलेल्या अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहनासाठी शासन अनुदान मंजूर करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल **(DPR)** पुढील बाबींची पूर्तता आवश्यक त्या कागपत्रांसह या कार्यालयास ***तात्काळ*** पाठवावा.

१) सोबत जोडलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालातील माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावी.
२) अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी आपल्या **नगर पंचायतीच्या मालकिची** किती एकर/गुंठे जागा उपलब्ध आहे त्याबाबतचा **७/१२ उतारा** सोबत जोडावा. तसेच त्या जागेवर अग्निशमन केंद्र बांधण्यास कोणत्याही अडचणी नाहीत असे प्रमाणित करावे.
३) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानात सहभागी होण्याबाबत नगरपंचायतीचा ठराव आवश्यक असून त्यामध्ये अग्निशमन सेवेसाठी फी आकारणे, आग सुरक्षा निधी चालू करणे व पदनिर्मिती करणे, नगरपंचायत हिश्श्याच्या रकमेची तरतूद अर्थसंकल्पात करणे, या सर्व बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.
४) वरील योजनेत सहभागी होण्यासाठी नगर परिषद हिश्श्याच्या रकमेची तरतूद **सन २०१६-१७** च्या अर्थसंकल्पात केल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
५) अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सोबत जोडावे.
६) वरील योजनेत सहभागी होण्यासाठी सोबतच्या नमुन्यानुसार **हमीपत्र** भरुन द्यावे.

आपला विश्वासू,

(प्र.सु.म्हैसगदळे)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान नव्याने निर्माण झालेल्या / होणाऱ्या ड-वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायती मध्ये राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि-२०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १२ ऑगस्ट, २०१६.

वाचा:- शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४६०/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१.०८.२००९.

**शासन निर्णय:-**

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४६० / ३६० / प्र.क्र.२११ / नवि-२०, दिनांक ३१.०८.२००९ अन्वये महाराष्ट्रातील ड-वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायती यांच्या अग्निशमन सेवेतील तूट भरून काढण्याकरीता व राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान" राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियान तेव्हा अस्तित्वात असलेल्या ड-वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीमध्ये राबविण्यात येत आहे. कालांतराने वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नवीन ड-वर्ग महानगरपालिका , नगरपरिषदा तसेच नगरपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यांचा समावेश महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियानात नसल्याने त्यांना सदर अभियानांतर्गत निधी मंजूर करणे शक्य होत नाही. याकरीता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

अ) नव्याने निर्माण झालेल्या/ होणाऱ्या ड-वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीमधील अग्निशमन सेवेची तूट भरून काढण्यासाठी त्यांचा महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान योजनेत समावेश करण्यात यावा.

आ) महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान योजनेत यापूर्वी "ड" वर्ग महानगरपालिका "अ", "ब" व "क" वर्ग नगरपरिषद, नगरपंचायतींना मंजूर करण्यात आल्याप्रमाणे व संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांनी शिफारस केल्यानुसार त्यांना अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहन याकरीता शासन हिश्श्याची रक्कम मंजूर करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१६०८१२१६४७२६८३२५ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.08.12 16:55:33 +05'30'

( ज. ना. पाटील )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई

२) सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
८) मा. लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
९) मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०) राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
११) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१२) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,सांताक्रुझ (पूर्व), मुंबई.
१३) मुख्याधिकारी (सर्व), नगरपरिषदा / नगरपंचायती
१४) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने
१५) निवडनस्ती.

# महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय

**शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दि.३१.०८.२००९ नुसार "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" अंतर्गत अग्निशमन केंद्र बांधणे व अग्निशमन वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल.**

## [ Detail Project Report ]

| | |
|---|---|
| **ड वर्ग महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायतीचे नाव व पत्ता** | |
| **मुख्याधिकायाचे नांव** | |
| **दूरध्वनी, मोबाईल व फॅक्स क्र.(एस.टि.डी. कोडसह)** | |
| **ई-मेल पत्ता** | |

| **अ. क्र.** | **तपशील** | **होय / नाही तपशिलासह** | **सोबत संबंधित कागदपत्रे** |
|---|---|---|---|
| | **अग्निशमन केंद्रांसाठी भूखंडाची उपलब्धता** | | |
| ०१ | दिड ते दोन एकर जागा उपलब्ध आहे का ?<br>प्रत्यक्षात किती एकर/गुंठे जागा उपलब्ध आहे त्याचा तपशील देण्यात यावा. | | |
| ०२ | जागेबाबतचा सर्व्हे नंबर देण्यात यावा. | | |
| ०३ | जागा उपलब्ध असल्यास ती नगरपरिषदेच्या मुख्यालयाच्या जवळच्या परिसरात उपलब्ध आहे का ? | | |
| ०४ | नसल्यास नेमकी जागा कुठे उपलब्ध आहे ? त्याचा तपशील द्यावा. | | |
| ०५ | मुख्यालयाच्या ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास निवडलेली अन्य जागा योग्य असल्याबाबतची कारणे स्पष्ट करा. | | |
| ०६ | सदर जागा ही विकास नियोजन आराखड्यामध्ये अग्निशमन केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे का ? नसल्यास ती जागा आरक्षित करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील देण्यात यावा. | | |
| ०७ | सदर जागेचा मालकी हक्क नगरपरिषदेकडे आहे का? (उदा. प्रॉपर्टी कार्ड, ७/१२ उतारा महानगरपालिकेच्या नांवावर आहे का?) | | |
| ०८ | सदर जागेवर अग्निशमन केंद्राचे बांधकाम करता येणार आहे काय?<br>अग्निशमन वाहन खरेदी व अग्निशमन केंद्राच्या बांधकामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यता सक्षम प्राधिका-यांकडून घेऊन सोबत सादर करावे. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९ | नकाशावर अग्निशमन केंद्राचे ठिकाण दर्शविणे. | | |
| १० | सदर जागेवरील अग्निशमन केंद्रात अग्निशमन अधिकारी / कर्मचा-यांची निवासस्थाने बांधणे शक्य आहे का? | | |
| ११ | निवासस्थान जवळ बांधणे शक्य नसल्यास त्याच्या जवळपास बांधणे शक्य होईल का? | | |
| १२ | भविष्यात सदर अग्निशमन केंद्रामध्ये वाढ करणे शक्य आहे का? | | |
| १३ | **शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दि.३१.०८.२००९ नुसार**<br>अ) नगरपरिषद हिश्श्याची रक्कम भरण्यास तयार आहेत काय? असल्यास त्यानुसार चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात तरतूद स्वनिधी अथवा शासन अनुदानातून करण्याबाबत केली आहे का?<br>ब) वरील प्रयोजनासाठी नगरपरिषदांची तयारी आहे का? असल्यास त्यांचा जो सहभाग आहे त्या सहभागातून त्यांनी प्रथमतः स्थापत्य काम म्हणजेच भूखंड विकसित करुन अग्निशमन केंद्राचे बांधकाम सुरु करणे इत्यादि कामे करावयाची आहेत. यास आपल्या मान्यत्येबाबत अभिप्राय द्यावा. | | |
| १४ | नगरपरिषद हिश्श्याच्या रकमेएवढे स्थापत्य काम पूर्ण केल्यानंतर याबाबत जिल्हाधिका-यांकडून तसे प्रमाणपत्र संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडे सादर करणे मान्य आहे का. | | |
| १५ | महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानात सहभागी होण्यासाठी त्याबाबतच्या अटी व शर्ती मान्य करुन तसे हमीपत्र मा.महापौर व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने दिले आहे का? हमीपत्र दिले नसल्यास त्याबाबतची कारणे काय आहेत? | | |
| १६ | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम, २००९ ची अंमलबजावणी सुरु केली आहे का व त्या अनुषंगाने **आग सुरक्षा निधी** [ Fire Protection Fund ] चालू केला आहे का व त्यासाठी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली आहे का? याबाबतच्या ठरावावर मा.महापौर व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरी असावी. | | |
| १७ | अग्निशमन वाहने सह उपकरणांसह खरेदी करण्यासाठी शासन स्तरावर दर करार करण्याची प्रक्रीया चालू आहे. या दर करारानुसार अग्निशमन वाहने सह उपकरणांसह खरेदी करण्याबाबत अभिप्राय द्यावा. | | |
| १८ | अग्निशमन केंद्र कार्यान्वित झाल्यास तसे शासन, संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, जिल्हाधिकारी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यालय तसेच आजूबाजूच्या ग्रामपंचायतींना लेखी कळविणे आवश्यक आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येसह २० कि.मी. परिसरातील अग्निशमन सेवा द्यावयाची असून त्या गावांची यादी अहवालासोबत जोडावी. | | |
| १९ | नगरपरिषदेच्या हद्दीच्या बाहेर २० कि.मी. पर्यंत विनामुल्य अग्निशमन सेवा देणे बंधनकारक आहे याबाबत अभिप्राय द्यावा. | | |
| २० | वाणिज्य व औद्योगिक आस्थापनांना अग्निशमन सेवा दिल्यास सेवाशुल्क आकाराणे बाबत अभिप्राय द्यावा. | | |
| २१ | अधिनियमानुसार फी आकरणे क्रमप्राप्त आहे. | | |
| २२ | **आग सुरक्षा निधी** लगेच स्थापन करणे आवश्यक आहे व सदर निधी फक्त अग्निशमन व्यवस्थेसाठी खर्च करावा. | | |
| २३ | पद निर्मितीसाठी आकृतीबंध ठरविणे व त्यानुसार नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव तयार करुन तो संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेमार्फत नगरपालिका प्रशासन संचालनालयाकडे पाठवावा. याबाबतचे सेवा प्रवेश नियम शासनाकडून तयार करण्यात येतील. | | |
| २४ | अग्निशमन सेवेतील विविध पदांसाठी शासन स्तरावर जे सेवा प्रवेश नियम केले जातील त्यानुसार नवनिर्मित पदांवर नियुक्त्या करणे बंधनकारक राहील. | | |
| २५ | कर्मचा-यांवरील वेतन व भत्त्यांचा आवर्ती खर्च नगरपरिषदेने स्वतःच्या अर्थसंकल्पातून करावा. | | |
| २६ | २०११ ची लोकसंख्या ठरावात घेणे. | | |

**टिप :** वरील ठिकाणी नमूद केल्याच्या पृष्ठ्यर्थ योग्य ती कागदपत्रे सादर करावीत व स्वतंत्र धारीका तयार करुन अथवा अहवाल तांत्रिक छाननीसाठी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०००९८ यांचेकडे सादर करावा. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र.०२२-२६६७७५५५ वर संपर्क साधावा.

सक्षम प्राधिका-यांची स्वाक्षरी व शिक्का

# U N D E R T A K I N G

**( On Rs.100/- Stamp Paper )**

The Government of Maharashtra in Urban Development Department has decided to implement "**Maharashtra Agnisuraksha Abhiyan**" vide Government Resolution, Urban Development Department No.अग्नस-1407/360/CR-211/UD-20, dated 31.08.2009 in order to wipe out the gap in Fire Services of Urban Local Bodies. As per this **Scheme,** Government will provide funding for procurement of Fire Engine and construction of Fire Station as prescribed in Annexure-D (Part-I) of above Government Resolution. In this scheme, the contribution of Government and Urban Local Bodies will be as under:

| Sr. No. | Type of Municipal Corporation / Council | Contribution of Govt. | Contribution of U.L.B. |
|---|---|---|---|
| 01 | Municipal Corporation - D Class | 35% | 65% |
| 02 | Municipal Council - A Class | 50% | 50% |
| 03 | Municipal Council - B Class | 70% | 30% |
| 04 | Municipal Council - C Class | 80% | 20% |
| 05 | Nagarpanchayat | 80% | 20% |

02. The followings are the terms and conditions for the Urban Local Bodies to get the benefit of this scheme:

1) The Urban Local Bodies should render their Fire and Emergency Services beyond their 20 k.m. areas free of cost. However, they may charge Fire Fee be from Commercial & Industrial Establishment.
2) The Urban Local Bodies should charge Fire Service Fee as prescribed in Schedule-I & II of the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006. The Urban Local Bodies should create **Fire Protection Fund** as per Section 25 of the Act. The amount deposited in this fund is to be exclusively used for purchased of sophisticated fire fighting equipment and partly for recurring expenditure on staff with the permission of Director.
3) The Urban Local Bodies should create different posts for their Fire Services as designed in Annexure-D (Part-II) of the Government Resolution, dated 31.08.2009. They also should provide minimum staff in their Fire Station round the clock for 8 hrs. duty. The staff should be increased **on pro-rata basis**, in accordance with category of Fire Station and number of Fire Vehicles. The proposal for creation of new post should be submitted to Government **through Directorate of Maharashtra Fire Services.** The recruitment on the post of Fire Officers and other staff should be made as per

the recruitment rules prescribed by the Director, Maharashtra Fire Services. No relaxation in Technical and Educational qualification should be waived in exceptional cases without approval of the Director, Maharashtra Fire Services.

4) D-Class Municipal Corporation should create post of Fire Officers and other staff as prescribed in above Government Resolution for their Fire Station. The recurring expenditure on staff should be borne by the respective Urban Local Bodies.

5) The Fire Engine and accessories should be purchased as per the rate contract fixed by the Technical Personnel Committee under the chairmanship of **Director, Maharashtra Fire Services, Mumbai.+**

6) The Fire Vehicles should be exclusively used for Fire and Rescue only purposes. In this regards instructions issued in Government Circular, Urban Development Department No.FFS.1408/429/UD-24 dated 17.08.2008 should be strictly complied with.

7) The Urban Local Bodies should comply with the instructions and order issued by the Fire Adviser to the Govt. of Maharashtra from time to time.

03. I am Shri / Smt.................................................Commissioner / Chief Officer .......................................................Municipal Corporation / Municipal Council / Nagarpanchayat do hereby agree with all above terms and conditions prescribed by the Government to get the benefit of above Scheme.

**Signature:**
**Name:**
**Name of U.L.B.**

Date:
Place:

Counter Signed by:

Mayor / President
Name of U.L.B.